**डिजीटाईज्ड कालबध्द सेवावर्ष- २०१५**

पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे.
३ रा मजला, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.
पीबीएक्स ०२० – २६१२६६२८ /२६१२६७८५/ २६११४०६४. फॅक्स ०२० – २६१२७००४/२६१३२४०१.
Email: - dirmktms@gmail.com Website: Mahapanan.maharashtra.gov.in

---

जा.क्र.पणन-५/ऑनलाईन सं.प्रणाली१२(१)/प्र.क्र.२०२/२०१५ दिनांक :- ०९ डिसेंबर,२०१५
शिबीर कार्यालय, नागपूर

## परिपत्रक

**विषय : कायदा कलम १२(१) नुसार बाजार समित्यांचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणे बाबत**

पणन संचालनालया कडून बाजार समित्यांना विविध विकास कामांसंदर्भात महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३, चे कलम १२(१) नुसार परवानगी देण्यात येते. यामध्ये लेआऊट (आराखडा), बांधकाम, दुरुस्ती व देखभाल, गाळे वाटप, जमिन खरेदी / विक्री, गाडी खरेदी / विक्री, वजन काटा इत्यादी बाबींचा समावेश आहे. सदरचे प्रस्ताव सदयस्थितीत बाजार समिती वास्तुशास्त्रज्ञाच्या मदतीने तयार करुन सदर प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक कार्यालयात सादर करते. जिल्हा उपनिबंधक सदरचे प्रस्ताव मंजुरीस्तव पणन संचालनालयास सादर करतात. पणन संचालनालय कार्यालयात सदर प्रस्तावाची छाननी करत असतांना बहुतांशवेळा आर्थिक परिस्थिती न सादर करणे, लेआऊट व नकाशे नसणे, आवश्यक प्रपत्रे नसणे, इत्यादी सर्वसाधारण त्रुटी आढळून येतात. तसेच काही वेळा बाजार समित्यांचे प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक कार्यालया मार्फत सादर न होता पणन संचालनालयास थेट सादर करण्यात येतात. यामुळे जिल्हा उपनिबंधक यांचे कार्यालयाकडुन अभिप्राय प्राप्त करण्यास व त्यानुसार छाननी करून कलम १२ (१) अन्वये पणन संचालनायाच्या स्तरावरून कार्यवाही करण्यास अनावश्यक विलंब होतो.

उपरोक्त बाब विचारात घेता कायदा कलम १२ (१) अन्वये प्राप्त होणा-या प्रस्तावावर यथाशिघ्र कार्यवाही प्रस्ताव करण्यासाठी ऑनलाईन संगणक प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. सदरची प्रणाली (http://sec12.msamb.com) या लिंकवर उपलब्ध असुन त्यात कलम १२ (१) अन्वये परवानगीसाठी आवश्यक असणारी प्रपत्रे समिविष्ट करण्यात आलेली आहेत. सर्व बाजार समित्यांना या परिपत्रकान्वये सुचित करण्यात येते की कायदा कलम १२(१) अन्वये मंजुरीचे प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था व

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांचे मार्फत **ऑनलाईन पध्दतीनेच सादर करणे अनिवार्य करण्यात येत आहे.** कायदा कलम १२(१) नुसार मंजुरीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करण्याबाबतच्या कार्यप्रणालीचे माहितीपत्रक सदर संगणक प्रणालीत डाऊन लोड करून घेण्यासाठी उपलब्ध आहे.

सर्व बाजार समित्यांनी व जिल्हा उपनिबंधक, विभागीय सहनिबंधक यांनी सदर परिपत्रकाची नोंद घेवुन कायदा कलम १२(१) अंतर्गत मंजुरीचे सर्व प्रस्ताव ऑनलाईन संगणक प्रणाली व्दारेच पणन संचालनालयास सादर करावेत. ऑनलाईन प्रणाली व्दारे सादर न केलेले कायदा कलम १२ (१) खालील मंजुरीचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. सदरचे परिपत्रकीय आदेश तात्काळ अमलात येतील. त्यानुसार सर्व संबंधितांनी कार्यवाही करणेची दक्षता घ्यावी.

**(डॉ.किशोर तोष्णीवाल)**
**पणन संचालक**
**महाराष्ट्र राज्य,पुणे**

**प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव :**

१) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
२) विभागीय सहनिबंधक , सहकारी संस्था (सर्व )
३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व )
४) सभापती / सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व)
५) निवड नस्ती

**प्रत माहितीस्तव सादर**

**मा.अपर मुख्य सचिव, पणन, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई**